अॅग्रोवन

गुरूवार २७ मार्च २०२५

महाअॅग्रो

# धनदांडग्यांचे प्रदूषण लपविण्यात प्रदूषण मंडळाच्या यंत्रणा गुंतल्या

## डॉ. माधव गाडगीळ यांचा आरोप; राम नदीसेवक पुरस्काराचे वितरण

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : देशातील नद्यांच्या प्रदूषणाची स्थिती चिंताजनक आहे. मात्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सरकारी यंत्रणा धनदांडग्यांचे प्रदूषण लपविणारे खोटे अहवाल देण्यात गुंतल्या आहेत, असा गंभीर आरोप ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ व विचारवंत डॉ. माधव गाडगीळ यांनी केला.

पाचव्या [illegible] राम नदी महोत्सवाच्या समारोप सोहळ्यात बुधवारी (ता. २६) पर्यावरण अभ्यासक व कार्यकर्ते डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना पहिला राम नदीसेवक पुरस्कार प्रदान करताना ते बोलत होते. किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव, आनंद चितळे, डॉ. गुरुदास नुलकर व्यासपीठावर होते. त्यावेळी डॉ. वडगबाळकर यांनी अभ्यास करीत लोकचळवळीच्या माध्यमातून राम नदीचे पुनरुज्जीवन केले. डॉ. गाडगीळ म्हणाले, ''राम नदीला जीवंत करण्यासाठी झालेले काम प्रशंसनीय आहे. देशातील सर्व नद्या संकटात असून त्यांनाही अस्तित्वासाठी पाठिंब्याची गरज आहे.''




पुणे : पर्यावरण अभ्यासक व कार्यकर्ते डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना पहिला राम नदीसेवक पुरस्कार प्रदान करताना ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ व विचारवंत डॉ. माधव गाडगीळ. सोबत व्यासपीठावर डावीकडून किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव, आनंद चितळे, डॉ. गुरुदास नुलकर

### सरकारी दस्तऐवजात 'नदी'चा होता 'नाला'

पुण्याच्या भुकुम भागातून उगम पावलेली राम नदी १९ किलोमीटरचा प्रवास करीत बाणेरजवळ मुळा नदीला येऊन मिळते. मात्र सरकारी दस्तऐवजात या नदीचा उल्लेख चक्क 'राम नाला' असा केला जात होता. सरकारी यंत्रणांच्या दुर्लक्षामुळेच या नदीला नाल्याचे रूप आले होते. राम नदीच्या खोऱ्यात सध्या पाच लाख लोकांची वस्ती असून, लोक चळवळीद्वारे या नदीच्या पुनरुज्जीवनाचा प्रयोग यशस्वी झाला आहे, असे या वेळी सांगण्यात आले.

प्रदूषण मंडळाच्या कारभारावर सडकून टीका करताना डॉ. गाडगीळ म्हणाले, ''देशातील सर्व प्रदूषण मंडळे त्या त्या राज्यांत खोटी माहिती देत असतात. कारखान्यांमुळे प्रदूषणामुळे उजनी धरणाची दुरवस्था झाली. विविध नद्यांमध्ये मैला सोडला जातो. मलनिस्सारण करणारी यंत्रणाही कुचकामी असते. मात्र मंडळाकडून स्वच्छ पाणी असल्याचे खोटे अहवाल दिले जातात. कुठेही खरी माहिती द्यायची नाही, असे आदेश विविध राज्यांच्या मंडळाला वरिष्ठ स्तरावरून दिले जात असतात.'' शासकीय यंत्रणा अपेक्षित काम करीत नसल्याने लोकांनीच नद्यांचा वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास करीत पर्यावरण व शास्त्रोक्त माहितीच्या आधारे लढा द्यावा लागेल, असाही सल्ला त्यांनी या वेळी दिला.

डॉ. वडगबाळकर म्हणाले, ''राम नदीच्या खोऱ्यातील नैसर्गिक झरे संकटात असून, त्यांना मुक्त करण्यासाठी अजूनही लढा चालू आहे.'' सूत्रसंचालन अनिल गायकवाड यांनी केले.

Service By: Vidisha Media Network- 9881736077